# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - (०२२) २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१
E-mail : desk1@dtemaharashtra.gov.in Website:www.dtemaharashtra.gov.in

महत्वाचे / कालमर्यादीत

क्रमांक: १/तंशिसं/२०१९-२०/११६
दिनांक : 20 JUN 2019

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे

विषय:- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शैक्षणिक संस्थांमधील रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरण्यासंदर्भात.....

संदर्भ :-महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. संकिर्ण-१११९/प्र.क्र.१२८/१९/तांशि-२, दि.१९/०६/२०१९.

उपरोक्त विषया संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या दिनांक ०६/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचना नुसार तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ०४/०६/२०१९ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनास अनुसरुन शैक्षणिक संस्थामधील रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. सदर समयबध्द कार्यक्रमाचा भाग म्हणून शैक्षणिक संस्थामधील {खाजगी व सार्वजनिक विद्यापीठे, सलंग्नित महाविद्यालये ( शासकीय व अशासकीय अनुदानित व खाजगी) } यांची संपुर्ण रिक्त पदाची माहिती url:- https://nherc.in या पोर्टलवर दिनांक २४/०६/२०१९ पूर्वी भरण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर विषया संदर्भात मा.सचिव ( उच्च शिक्षण ) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली हे दिनांक २५/०६/२०१९ रोजी व्हीडीओ कॉन्फरसिंगव्दारे आढावा घेणार असल्याने तत्पूर्वी सदर पदाची माहिती पोर्टलवर भरण्याबाबतची कार्यवाही होणे आवश्यक आहे.तरी खालीलप्रमाणे सूचना विचारात घेऊन आपल्या अधिपत्याखालील संस्थामधील रिक्त पदांची माहिती url:- https://nherc.in या पोर्टलवर भरण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच याबाबतचा दैनिक अहवाल शासनास सादर करणेसाठी संचालनालयास सादर करण्यात यावा.

१. खाजगी संस्था :- सर्व खाजगी विद्यापीठे / अभिमत विद्यापिठे, खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालये / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये / वास्तुशास्त्र महाविद्यालये या शैक्षणिक संस्थांना नमूद पोर्टलवर विहित मुदतीत माहिती भरण्याबाबत कळविण्यात यावे.

२. अनुदानित सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था :- या संदर्भात शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरणे आवश्यक आहे. अनुदानित संस्थांनी रिक्त पदांची माहिती संबंधित पोर्टलवर भरणे आवश्यक असल्याने संस्थांनी परस्पर माहिती भरल्यास

त्यामध्ये तफावत होईल, यास्तव या पोर्टलवर अनुदानित महाविद्यालयांनी परस्पर माहिती न भरता सदरहू माहिती भरण्याकरिता संबंधित सहसंचालकांनी त्यांच्या अधिनस्त अनुदानित महाविद्यालयांच्या कार्यशाळा आयोजित करुन, भरण्यात येणारी माहिती सहसंचालकांनी प्रमाणित करुन कार्यशाळेमध्ये सदर माहिती महाविद्यालयाकडून भरली जाईल, याची खात्री करावी.

३. शासकीय पदवी महाविद्यालये :- या संदर्भात शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधानुसार रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरणे आवश्यक असल्याने संबंधित विभागीय सहसंचालक, यांनी प्रमाणित केल्यानंतरच सदरहू माहिती पोर्टलवर भरण्याची कार्यवाही शासकीय महाविद्यालयांनी करावी.

४. विद्यापीठे :- या संदर्भात शासनाने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरणे आवश्क असल्याने संबंधित विभागीय सहसंचालक, यांनी प्रमाणित केल्यानंतरच सदरहू माहिती पोर्टलवर भरण्याची कार्यवाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांनी करावी.

५. रसायन तंत्रज्ञान संस्था ( शासनाचे अभिमत विद्यापिठ) :- या संदर्भात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या तरतुदीनसार आकृतीबंध विचारात घेऊन रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरणे आवश्क असल्याने संबंधित विभागीय सहसंचालक, यांनी प्रमाणित केल्यानंतरच सदरहू माहिती पोर्टलवर भरण्याची कार्यवाही रसायन तंत्राज्ञान संस्था यांनी करावी.

सदर माहिती ही २३/०६/२०१९ पूर्वी सदर पोर्टलवर भरणे बाबतची योग्य ती दक्षता सहसंचालकांनी घ्यावी. याबाबतचा आढावा मा.सचिव , उच्च व तंत्रशिक्षण विभाग हे दिनांक २४ /०६/२०१९ रोजी घेणार असल्याने विहित मुदतीत कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी.

( डॉ.अभय वाघ )
संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2019/ 1853
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 21 JUN 2019

प्रति,

प्राचार्य,
सर्व खाजगी अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त् पत्रात नमुद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयाच्या रिक्त पदांची माहिती url:- https://nherc.in या पोर्टलवर दि. 24/06/2019 पुर्वी अद्यावत करावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर